|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

परीक्षा गोपनिय उत्तरार्ध विभाग

जा.क्र.कबचौउमवि/७-आय/२०८५/२०२६ दि.०६/०७/२०२६

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

**विषय :- अध्यादेश क्र. १३४/२००७ अन्वये उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) व पुनर्मूल्यांकन (Redressal) प्रक्रियेनंतर पुनर्पडताळणीसंदर्भातील पत्रव्यवहाराबाबत.**

**महोदय / महोदया,**

विद्यापीठामार्फत आयोजित उन्हाळी तसेच हिवाळी परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेबाबत शंका असल्यास विद्यापीठाने अध्यादेश क्र. १३४ अन्वये केवळ दोन (२) विषयांसाठी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) तसेच Redressal ची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

सदर प्रक्रियेनुसार संबंधित विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेची नियमानुसार कार्यवाही करून त्यांना "Change" अथवा "No Change" असा निकाल ई-मेलव्दारे कळविण्यात येतो.

याबाबत सर्व संबंधितांना स्पष्टपणे कळविण्यात येते की, अध्यादेश क्र. १३४ अंतर्गत Redressal ची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत संबंधित उत्तरपत्रिका पुन्हा तपासून देण्याची अथवा पुनर्विचारासाठी स्वीकारण्याची तरतूद अध्यादेशात नाही. त्यामुळे Redressal चा "No Change" असा प्राप्त झाल्यानंतर उत्तरपत्रिका पुन्हा तपासून देण्याबाबत अथवा पुनर्मूल्यांकन करण्याबाबत कोणतीही विनंती ग्राह्य धरली जाणार नाही.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की काही विद्यार्थी "No Change" प्राप्त झाल्यानंतर संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत पत्रव्यवहार न करता थेट मा.कुलगुरू, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ तसेच विद्यापीठातील इतर अधिका-यांकडे उत्तरपत्रिका पुन्हा तपासून देण्याबाबत निवेदन व तक्रारी सादर करीत असतात. अशा प्रकारचा पत्रव्यवहार अध्यादेशातील तरतुदींशी सुसंगत नाही.

**ही बाब विचारात घेता, यासंदर्भात पुढील सूचनांचे काटेकोर पालन करावे :**

१. परीक्षा विषयक कोणतेही निवेदन, तक्रार अथवा विनंती विद्यार्थी यांनी थेट विद्यापीठाकडे न पाठविता संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फतच सादर करावी.

२. प्राचार्यांनी संबंधित प्रकरणाची पडताळणी करून, विद्यापीठाच्या नियम व अध्यादेशांनुसार विचार होऊ शकणा-या बाबीच आवश्यक अभिप्रायासह विद्यापीठाकडे पाठवाव्यात.

..२

३. अध्यादेश क्र. १३४ अंतर्गत उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) तसेच Redressal प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यास "Change" अथवा "No Change" असा निकाल ई-मेलव्दारे कळविण्यात येतो. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उत्तरपत्रिका पुन्हा तपासून देणे, पुनर्मूल्यांकन करणे अथवा पुर्नविचार करणे याबाबत अध्यादेशात कोणतीही तरतूद नसल्याने अशा स्वरूपाच्या कोणत्याही मागण्या अथवा पत्रव्यवहाराचा विद्यापीठाकडून विचार केला जाणार नाही.

४. त्यामुळे Redressal प्रक्रियेनंतर "No Change" प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिका पुन्हा तपासून देण्याबाबत कोणताही पत्रव्यवहार करू नये. तसेच अशा प्रकारची निवेदने महाविद्यालयांनीही विद्यापीठाकडे अग्रेषित करू नयेत.

५. तसेच सदर सुचना सर्व विद्यार्थ्यांच्या व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात तसेच महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व अधिकृत माध्यमांवर प्रसिध्द कराव्यात.

कळावे,

**(प्रा. योगेश पाटील)**
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
कबचौ उमवि, जळगाव

प्रत: १. मा. कुलगुरू महोदय, कबचौ उमवि, जळगाव
२. मा. प्र-कुलगुरू महोदय, कबचौ उमवि, जळगाव